शिवसेना

# राज्य सरकारचे वर्षभरातील निर्णय

**एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकारची आज वर्षपूर्ती. वर्षभरात या सरकारने विविध समाजघटक आणि क्षेत्रांसाठीच्या निर्णयांचा धडाका लावला. हे निर्णय दृष्टिक्षेपात...**

- अतिवृष्टीग्रस्तांना एनडीआरएफच्या दुप्पट रक्कम आणि दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत.
- ७०९३.१९ कोटी रुपये इतका निधी ६२ लाख ६० हजार शेतकऱ्यांना.
- सततचा पाऊस आता नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित.
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १५०० कोटींचे वाटप करणार. ७५५ कोटीची प्रारंभिक मदत.
- १२.८४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४६८३ कोटी रुपये प्रोत्साहनपर वाटप.
- नुकसानग्रस्त कांदा उत्पादकांसाठी ३५० रुपये प्रती क्विंटल अर्थसहाय
- धान उत्पादकांना हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर मदत
- २९ जलसंपदा प्रकल्पांना सुधारित मान्यता.
- ६.५ लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीला सिंचनाचा फायदा.
- नमो शेतकरी महासन्मान योजनेत राज्यातर्फे प्रत्येक शेतकऱ्याला ६ हजार रुपये.
- १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना लाभ
- शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपयांत पीक विमा.
- ३३१२ कोटी रुपये सरकार भरणार.
- अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती धोरण
- देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन, संरक्षणासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना
- जलयुक्त शिवार अभियान ५ हजार गावांत राबविणार
- ग्रामीण कुटुंबांना सक्षम करणारे सुविधा संपन्न कुटुंब मिशन
- हर घर जल: १ लाख १४ हजार ३४० नळजोडणी
- प्रकल्पबाधित मासेमारांना नुकसानभरपाईसाठी धोरण. ५० कोटींचा मत्स्यविकास कोष
- विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र ही तीनही वैधानिक विकास मंडळे परत स्थापन करणार.
- समतोल प्रादेशिक विकासासाठी समिती स्थापणार
- हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे दोन टप्पे सुरु
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण



- मुंबईत मेट्रो २ ए आणि ३ मार्ग सुरु. लाखो प्रवाशांना फायदा
- मुंबईतल्या ४०० किमी रस्त्यांच्या काँक्रीटीकरण सुरू
- राज्यभर ७०० 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करणार.
- मुंबईत २० दवाखाने सुरू.
- स्वातंत्र्यसैनिकांच्या निवृत्ती वेतनात दहा हजारांहून वीस हजार इतकी वाढ.
- ७५ वर्षे पूर्ण ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत १० कोटी ज्येष्ठांना लाभ
- एसटीमध्ये महिलांना प्रवासात पन्नास टक्के सवलत. १४ कोटी महिलांनी घेतला लाभ
- औरंगाबाद शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे नाव धाराशिव
- दावोस येथे महाराष्ट्रात १ लाख ३७ हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार
- स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग सुरू
- दिवाळीप्रमाणेच गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १०० रुपयांत आनंदाचा शिधा.
- ७५ हजार रिक्त पदे भरती सुरू. पदभरती परीक्षा टीसीएस, आयबीपीएसमार्फत.
- योजनांचा थेट लाभ देणारा शासन आपल्या दारी उपक्रमास प्रचंड प्रतिसाद
- शासकीय नोकरीत नियुक्तीसाठी अधिसंख्य पदे निर्माण. नियुक्ती प्रक्रिया सुरु
- निती आयोगाच्या धर्तीवर मित्र संस्था स्थापन. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचे काम सुरु
- गतिमान प्रशासनासाठी विभागीय आणि जिल्हा स्तरांवर मुख्यमंत्री सचिवालये सुरु
- निवेदने, पत्र स्वीकारण्यासाठी मंत्रालयात सेंट्रल रजिस्ट्री सुरु
- इतर मागासवर्गीयांसाठी ३ वर्षांत १० लाख घरांची 'मोदी आवास घरकुल योजना'राबविणार
- १३८ विशेष जलदगती न्यायालयांच्या कामकाजास गती. ४१४ नियमित पदे निर्माण करणार
- अर्थसंकल्पात धनगर समाजाला १ हजार कोटींची तरतूद. महाराष्ट्र मेंढी,शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करणार.
- महात्मा ज्योतिराव फुले जनारोग्य योजनेत विमा संरक्षण १.५० लाखांहून ५ लाख रुपये वाढ
- मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे ७२ कोटी मदत
- पाचवी तसेच आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ
- अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्यात केंद्राप्रमाणे सुधारणा.
- लेक लाडकी' योजनेत पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबांतील मुलींना लाभ देणार
- लाड समितीच्या शिफारशींचा लाभ सर्वच सफाई कामगारांना. नोकरी आणि घराचीही शाश्वती
- "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा" गीताला महाराष्ट्र राज्यगीताचा दर्जा
- नॅक, एनबीए मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मार्गदर्शनासाठी परिस स्पर्श योजना.
- बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकासास मोठे प्रोत्साहन. अधिमूल्य, विकास अधिभारामध्ये ५० टक्के सवलत
- नव्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता. २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार
- नवीन कामगार संहितेस मान्यता.
- नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणास मान्यता. ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार
- पर्यटन व्यवसायात महिलांचे सक्षमीकरण व्हावे म्हणून "आई" हे महिला केंद्रित पर्यटन धोरण
- वारकऱ्यांसाठी विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना. १५ लाख वारकऱ्यांना दिलासा मिळणार
- कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपये वाढ. आता मिळणार १६ हजार दरमहा
- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मध्ये - ११ लाख ३० हजार २१२ घरे पूर्ण